भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# खलाशी भविष्य निधि अधिनियम, १९६६

(१९६६ चा अधिनियम क्रमांक ४)

[१ नोव्हेंबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Seamen's Provident Fund Act, 1966

(Act No. 4 of 1966)

[*As in force on 1st November, 1977*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

( १९७८ )

[किंमत पन्नास पैसे]

# खलाशी भविष्य निधि अधिनियम, १९६६

## कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव व प्रयुक्ती.

२. व्याख्या.

३. खलाशी भविष्य निधि योजना.

४. निधी निहित होणे, इ.

५. विश्वस्त मंडळाची स्थापना.

६. समित्या.

७. मंडळाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती.

८. अंशदाने.

९. नियोक्त्याकडून येणे असलेल्या रकमा ठरवणे.

१०. नियोक्त्याकडून येणे असलेल्या रकमांच्या वसुलीची पद्धती.

११. हा निधी १९६१ चा अधिनियम क्र. ४३ खालील मान्यताप्राप्त भविष्य निधी असल्याचे मानावयाचे.

१२. जप्तीपासून संरक्षण.

१३. अंशदानाच्या प्रदानास अन्य ऋणांपेक्षा पूर्वता.

१४. नियोक्त्याने वेतनात घट करावयाची नाही.

१५. निरीक्षक.

१६. दंड.

१७. कंपन्यांनी केलेले गुन्हे.

१८. नुकसानी वसूल करण्याची शक्ती.

१९. खातेबदल.

२०. सूट देण्याची शक्ती.

२१. सद्भावपूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.

२२. प्रत्यायोजन.

२३. अडचणी दूर करण्याची शक्ती.

२४. योजना संसदेच्या सभागृहांपुढे मांडावयाची.

अनुसूची.

# खलाशी भविष्य निधि अधिनियम, १९६६

## (१९६६ चा अधिनियम क्रमांक ४)

[२६ मार्च, १९६६]

खलाशांसाठी भविष्य निधी सुरू करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या सतराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :--

संक्षिप्त नाव व प्रयुक्ती.

१. (१) या अधिनियमास 'खलाशी भविष्य निधि अधिनियम, १९६६' असे म्हणता येईल.

(२) अन्यथा स्पष्टपणे उपबंधित करण्यात आले नसेल तर, या अधिनियमाचे उपबंध प्रत्येक खलाशाला व अशा खलाशाच्या नियोक्त्याला लागू होतील.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,--

(क्) "यानिकगणाशी केलेला करार" याचा अर्थ, 'व्यापारी नौवहन अधिनियमा' च्या कलम १०० मध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, कलम ११४ मध्ये निर्देशित केलेला करार असा आहे ;

(ख्) "मंडळ" याचा अर्थ, कलम ५ खाली स्थापन केलेले खलाशी भविष्य निधीचे विश्वस्त मंडळ असा आहे ;

(ग्) "सलग विमुक्ति-प्रमाणपत्र" याचा अर्थ, 'व्यापारी नौवहन अधिनियमा' च्या कलम ९९ मध्ये निर्देशित केलेले प्रमाणपत्र असा आहे ;

(घ्) "अंशदान" याचा अर्थ, योजनेखालील सदस्याच्या बाबतीत प्रदेय असणारे अंशदान असा आहे ;

(ङ्) "नियोक्ता" याचा खलाशाच्या संबंधातील अर्थ, खलाशी ज्या जहाजावर नोकरीला किंवा कामाला असेल त्या जहाजाचा मालक, किंवा अशा मालकाचा अभिकर्ता किंवा जहाजाचा नौकाधिपती असा आहे ;

(च्) "निधि" याचा अर्थ, योजनेखाली स्थापन केलेला खलाशी भविष्य निधी असा आहे ;

(छ्) "शासन" याचा अर्थ, केंद्र शासन असा आहे ;

(ज्) "नौकाधिपति" आणि "जहाज" यांना 'व्यापारी नौवहन अधिनियमा'त त्यांना नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ आहेत ;

(झ्) "सदस्य" याचा अर्थ, ज्याच्याकडे सलग विमुक्ति-प्रमाणपत्र असून ज्याला निधीचा सदस्य म्हणून दाखल करून घेण्यात आले आहे असा खलाशी असा आहे ;

(ञ्) "व्यापारी नौवहन अधिनियम" याचा अर्थ, 'व्यापारी नौवहन अधिनियम, १९५८' (१९५८ चा ४४) असा आहे ;

(ट्) "योजना" याचा अर्थ, कलम ३ चे पोटकलम (१) याखाली तयार केलेली खलाशी भविष्य निधि योजना असा आहे ;

(ठ्) "खलाशी" याचा अर्थ, 'व्यापारी नौवहन अधिनियमा' खाली जहाजाच्या यानिकगणाचा सदस्य म्हणून नोकरीला किंवा कामाला असलेली व्यक्ती असा आहे, पण यात नौकाधिपती, नौकानयन किंवा अभियांत्रिकी अधिकारी, रेडिओ अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, कल्याण अधिकारी, पोतनीस, वीजतंत्री, परिचारक, संगीतज्ञ, बंदर बाटाड्या, शिकाऊ उमेदवार किंवा जहाजी नापित यांचा समावेश होत नाही ;

(ड्) "सेवा" याचा अर्थ, यानिकगणाशी केलेल्या कराराखाली खलाशाने केलेल्या नोकरीचा कालावधी असा आहे आणि त्यात ज्या कालावधीचे वेतन त्याला दिलेले आहे किंवा प्रदेय आहे अशा कोणत्याही कालावधीचा समावेश होतो ;

(ढ्) "वेतन" याचा अर्थ, यानिकगणाशी केलेल्या कराराखाली खलाशाला त्या त्या वेळी प्रदेय असणारे मूळ वेतन असा आहे आणि त्यात--

(एक) सुटचा किंवा कोणत्याही रजेचा अवधी यांच्या संबंधात तो ज्या पारिश्रमिकाला हक्कदार असेल असे कोणतेही पारिश्रमिक,

(दोन) अशा करारानुसार किंवा दोन्ही पक्षांमधील अन्य कोणत्याही करारानुसार झालेली, अशा वेतनातील कोणतीही वाढ,

यांचा समावेश होतो, परंतु त्यात अतिकालिक भत्त्याचा समावेश होत नाही.

खलाशी भविष्य निधि योजना.

३. (१) केंद्र शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे खलाशांसाठी भविष्य निधी स्थापन करण्याकरिता 'खलाशी भविष्य निधि योजना' नावाची एक योजना तयार करता येईल आणि योजना तयार केल्यानंतर होईल तितक्या लवकर, या अधिनियमाचे उपबंध आणि योजना यांनुसार एक निधी स्थापन केला जाईल.

(२) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, या योजनेद्वारा या अधिनियमाच्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील.

(शा.म.मु.) प्र. दोन अ एच ४८२६--२ (१०५५--१०-७८)

(३) या योजनेच्या उपबंधांपैकी कोणतेही उपबंध योजनेमध्ये याबाबत विनिर्दिष्ट केले असेल अशा दिनांकी भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी रीत्या परिणामक होतील असे योजनेमध्ये उपबंधित करता येईल.

(४) त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या, या अधिनियमाहून अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाहून अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे परिणामक असलेल्या कोणत्याही संलेखामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ही योजना परिणामक होईल.

(५) केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे योजनेमध्ये अधिक भर घालता येईल, विशोधन करता येईल, बदल करता येईल किंवा ती विखंडित करता येईल.

निधी निहित होणे, इ.

४. (१) कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेला निधी कलम ५ खाली स्थापन केलेल्या मंडळाच्या ठायी निहित होईल व त्याद्वारा त्याचे प्रशासन केले जाईल.

(२) निधीमधील पैशांचा विनियोग—

(क) मंडळाच्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते आणि मंडळाचा अन्य प्रशासनिक खर्च भागवण्यासाठी,

(ख) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी

केला जाईल.

(३) निधीमधील सर्व पैसे भारतीय स्टेट बँकेमध्ये ठेवले जातील किंवा शासन मान्यता देईल अशा रोख्यांमध्ये गुंतवले जातील.

विश्वस्त मंडळाची स्थापना.

५. (१) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तीमध्ये विनिर्दिष्ट केले असेल त्या दिनांकापासून 'खलाशी भविष्य निधि विश्वस्त मंडळ' म्हणून ओळखले जाणारे असे एक मंडळ स्थापन करील. हे मंडळ म्हणजे उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असलेला निगम-निकाय असेल आणि त्या नावाने त्याला किंवा त्याविरुद्ध दावा लावता येईल.

(२) मंडळाचे मुख्य कार्यालय मुंबईमध्ये किंवा केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य ठिकाणी असेल.

(३) मंडळ पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल :—

(क) शासनाने नियुक्त करावयाचा अध्यक्ष;

(ख) शासनाने आपल्या पदाधिकाऱ्यांमधून नियुक्त केलेल्या जास्ती जास्त तीन व्यक्ती;

(ग) शासनाने याबाबतीत मान्यता दिली असेल अशा नियोक्ता-संघटनेशी किंवा संघटनांशी विचार-विनिमय करून नंतर शासनाने नियुक्त करावयाच्या अशा, नियोक्त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तीन व्यक्ती;

(घ) शासनाने याबाबतीत मान्यता दिली असेल अशी किंवा अशा खलाशी संघटना यांच्याशी विचारविनिमय करून नंतर शासनाने नियुक्त करावयाच्या अशा, खलाशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती.

(४) कोणत्या अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने मंडळाचा सदस्य नियुक्त करता येईल ते आणि गणसंख्येसुद्धा मंडळाच्या सभांची वेळ, जागा आणि कार्यपद्धती ही योजनेमध्ये उपबंधित केल्याप्रमाणे असेल.

(५) मंडळ हे त्याच्या ठायी निहित केलेल्या निधीचे योजनेमध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा रीतीने प्रशासन करील.

(६) मंडळ हे योजनेच्या कोणत्याही उपबंधाद्वारे किंवा त्याखाली पार पाडावी लागणारी अशी अन्य कार्ये पार पाडील.

समित्या.

६. (१) मंडळाला आपल्या कोणत्याही शक्तीचा वापर करण्यासाठी किंवा आपले कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी किंवा मंडळ जी कोणतीही बाब निर्देशित करील त्या बाबतीत चौकशी करून किंवा त्याबाबत अहवाल देऊन त्यावर सल्ला देण्यासाठी अशी एक समिती किंवा अनेक समित्या वेळोवेळी स्थापन करता येतील.

(२) ज्या व्यक्ती मंडळाच्या सदस्य नाहीत अशा व्यक्तींचा समितीमध्ये समावेश होऊ शकेल, पण त्यांची संख्या समितीच्या सदस्य-संख्येच्या निम्म्याहून अधिक असणार नाही.

मंडळाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती.

७. (१) शासन एका खलाशी भविष्य निधि आयुक्ताची नियुक्ती करील व तो मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल व मंडळाच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या व अधीक्षणाच्या अधीन असेल.

(२) शासन खलाशी भविष्य निधि आयुक्ताला त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी सहाय्य करण्याकरिता आपणास आवश्यक वाटतील तितके खलाशी भविष्य निधि उपआयुक्त व ज्यांचा कमाल मासिक पगार सहाशे रुपयांहून कमी नसेल असे अन्य अधिकारी यांचीसुद्धा नियुक्ती करू शकेल.

(३) मंडळाला योजनेच्या कार्यक्षम प्रशासनासाठी त्याला आवश्यक वाटतील तितके अन्य अधिकारी व कर्मचारी नियुक्त करता येतील.

(४) खलाशी भविष्य निधि आयुक्ताच्या किंवा खलाशी भविष्य निधि उपआयुक्ताच्या पदावरील किंवा सहाशे रुपयांहून कमी नाही इतका कमाल मासिक पगार लागू असणाऱ्या अन्य कोणत्याही पदावरील कोणतीही नियुक्ती, संघ लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय केल्याशिवाय केली जाणार नाही :

परंतु,–

(क्) एक वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी, किंवा

(ख्) जर नियुक्त करावयाची व्यक्ती तिच्या नियुक्तीच्या वेळी––

(एक) भारतीय प्रशासन सेवेतील सदस्य असेल, किंवा

(दोन) शासनाच्या प्रथम वर्गाच्या किंवा द्वितीय वर्गाच्या पदावरील सेवेत असेल किंवा मंडळाच्या सेवेत असेल,

तर अशा कोणत्याही नियुक्तीच्या बाबतीत अशा कोणत्याही विचारविनिमयाची आवश्यकता असणार नाही.

(५) खलाशी भविष्य निधि आयुक्त व पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेले अन्य अधिकारी यांची भरती करण्याची पद्धती, पगार व भत्ते, अनुशासन व अन्य सेवाशर्ती शासन विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असतील.

(६) मंडळाचे अन्य अधिकारी व कर्मचारी यांची भरती करण्याची पद्धती, पगार व भत्ते, अनुशासन व अन्य सेवाशर्ती शासनाची मान्यता घेऊन मंडळ विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असतील.

(७) या कलमाखाली नियुक्त केलेल्या सर्व व्यक्ती हे मंडळाचे कर्मचारी असतील.

अंशदाने.

८. (१) ज्याला हा अधिनियम लागू होतो तो प्रत्येक नियोक्ता, त्याने नियुक्त केलेल्या प्रत्येक खलाशाच्या (सदस्य असलेल्या) बाबतीत १ जुलै, १९६४ रोजी सुरू होणाऱ्या व ३१ मार्च, १९६८ रोजी संपणाऱ्या कालावधीकरिता, अशा प्रत्येक खलाशाला दिलेल्या किंवा प्रदेय असलेल्या वेतनाच्या सहा टक्के दराने व त्यानंतर आठ टक्के दराने निधीमध्ये अंशदान करील आणि असा प्रत्येक खलाशीसुद्धा त्याच्या बाबतीत नियोक्त्याकडून प्रदेय असलेल्या अंशदानाइतक्या रकमेचे निधीमध्ये अंशदान करील :

परंतु, पूर्वोक्त अंशदानाची रक्कम जेथवर ती योजनेच्या प्रारंभापूर्वीच्या कालावधीशी संबंधित असेल तेथवर नियोक्त्याकडून किंवा, प्रकरणपरत्वे, खलाशाकडून शासन याबाबतीत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशाच दिनांकी (तो दिनांक योजनेच्या प्रारंभानंतरच्या साठ दिवसांच्या अलिकडचा नसावा) प्रदेय असेल.

(२) नियोक्ता हा त्याने नियुक्त केलेल्या प्रत्येक खलाशाच्या (सदस्य असलेल्या) बाबतीत नियोक्त्याचे व कर्मचाऱ्याचे अशी दोन्ही अंशदाने देईल आणि तो कर्मचाऱ्याचे अंशदान खलाशाच्या वेतनात कपात करून–अन्यथा नव्हे–त्याच्याकडून वसूल करण्यास हक्कदार असेल.

(३) प्रत्येक नियोक्ता निधीचे प्रशासन करावयाच्या खर्चापोटी योजनेमध्ये विनिर्दिष्ट केली असेल अशी रक्कमसुद्धा देईल.

(४) जेव्हा पोटकलम (१) खालील कोणत्याही अंशदानाच्या रकमेत किंवा पोटकलम (३) खाली प्रदेय असलेल्या कोणत्याही रकमेत रुपयाचा एखादा अपूर्णांश असेल तेव्हा, जर असा अपूर्णांश पन्नास पैसे किंवा त्याहून अधिक असेल तर तो वाढवून त्याचा एक रुपया धरला जाईल आणि जर तो पन्नास पैशाहून कमी असेल तर तो हिशेबात धरला जाणार नाही.

नियोक्त्याकडून येणे असलेल्या **रकमा** ठरवणे.

९. (१) खलाशी भविष्य निधि आयुक्ताला किंवा खलाशी भविष्य निधि उपआयुक्ताला, या अधिनियमाच्या किंवा योजनेच्या कोणत्याही उपबंधाखाली कोणत्याही नियोक्त्याकडून येणे असणारी रक्कम आदेशाद्वारे निश्चित करता येईल आणि या प्रयोजनार्थ त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी चालवता येईल.

(२) पोटकलम (१) खालील चौकशीच्या प्रयोजनार्थ अशी चौकशी चालवणाऱ्या अधिकाऱ्याला, दाव्याची संपरीक्षा करण्यासाठी पुढील बाबींसंबंधी 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली न्यायालयाच्या ठायी ज्या शक्ती निहित केल्या आहेत त्याच शक्ती असतील, त्या बाबी अशा :––

(क्) कोणत्याही व्यक्तीस उपस्थित राहण्यास भाग पाडणे किंवा तिची शपथेवर तपासणी करणे;

(ख्) दस्तऐवज प्रकट व दाखल करावयास लावणे;

(ग्) प्रतिज्ञालेखावर पुरावा घेणे;

(घ्) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे पाठवणे;

आणि अशी कोणतीही चौकशी ही 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याची कलमे १९३ व २२८ यांच्या अर्थानुसार आणि त्यातील कलम १९६ च्या प्रयोजनार्थ न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

(३) नियोक्त्याला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय या कलमाखाली कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(४) या कलमाखाली काढलेला आदेश अंतिम असेल आणि तो कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करता येणार नाही.

नियोक्त्याकडून येणे असलेल्या रकमांच्या वसुलीची पद्धती.

१०. निधीप्रत प्रदेय असणाऱ्या कोणत्याही अंशदानाच्या संबंधात नियोक्त्याकडून येणे असलेली रक्कम, किंवा कलम १८ खाली वसुलीयोग्य असलेली नुकसानी किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाखाली किंवा योजनेच्या कोणत्याही उपबंधाखाली त्याने द्यावयाचा कोणताही खर्चवेच जर थकित असेल तर, शासनाला ती रक्कम जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.

हा निधी १९६१ चा अधिनियम क्र. ४३ खालील मान्यताप्राप्त भविष्य निधी असल्याचे मानावयाचे.

११. 'प्राप्तिकर अधिनियम, १९६१' (१९६१ चा ४३) याच्या प्रयोजनार्थ हा निधी त्या अधि-नियमाच्या अर्थानुसार मान्यताप्राप्त भविष्य निधी असल्याचे मानण्यात येईल.

जप्तीपासून संरक्षण.

१२. (१) निधीमध्ये कोणत्याही सदस्याच्या जमाखाती असलेली रक्कम ही कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित किंवा प्रभारित करता येण्यासारखी असणार नाही आणि सदस्याने केलेल्या कोणत्याही ऋणाच्या किंवा ओढवलेल्या कोणत्याही दायित्वाच्या संबंधात कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली जप्तीस पात्र असणार नाही, आणि 'इलाखा शहरे नादारी अधिनियम, १९०९' (१९०९ चा ३) याखाली नियुक्त केलेला कोणताही पदस्थ अभिहस्तांकिती किंवा 'प्रांतीय नादारी अधिनियम, १९२०' (१९२० चा ५) याखाली नियुक्त केलेला कोणताही प्रापक अशा कोणत्याही रकमेस हक्कदार असणार नाही किंवा तिच्याबाबत त्याला कोणतीही हक्कमागणी करता येणार नाही.

(२) निधीमध्ये कोणत्याही सदस्याच्या जमाखाती त्याच्या मृत्यूच्या वेळी असलेली आणि योजनेखाली त्याच्या नामनिर्देशितीला प्रदेय असलेली कोणतीही रक्कम योजनेद्वारा प्राधिकृत केलेल्या कोणत्याही वजातीच्या अधीनतेने नामनिर्देशितीच्या ठायी निहित होईल आणि सदस्याच्या मृत्यूपूर्वी मृताने किंवा नामनिर्देशितीने केलेल्या कोणत्याही ऋणापासून किंवा ओढवलेल्या अन्य दायित्वापासून ती मुक्त राहील.

अंशदानाच्या प्रदानास अन्य ऋणांपेक्षा पूर्वता.

१३. जेव्हा कोणताही नियोक्ता नादार म्हणून अभिनिर्णीत केला गेला असेल किंवा तो नियोक्ता म्हणजे कंपनी असल्यास तिच्या परिसमापनाचा आदेश काढला गेला असेल तेव्हा, निधीप्रत प्रदेय असणाऱ्या कोणत्याही अंशदानाच्या संबंधात नियोक्त्याकडून येणे असलेली रक्कम, कलम १८ खाली वसुलीयोग्य असलेली नुकसानी अथवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाखाली किंवा योजनेच्या कोणत्याही उपबंधाखाली प्रदेय असलेला कोणताही खर्चवेच याबाबतचे दायित्व, अभिनिर्णयाचा किंवा परिसमापनाचा आदेश काढला त्यापूर्वीच प्रोद्‌भूत झाले असेल तर, नादाराच्या संपत्तीची वाटणी किंवा, प्रकरणपरत्वे, परिसमापन झालेल्या कंपनीच्या मत्तेची वाटणी करताना 'इलाखा शहरे नादारी अधिनियम, १९०९' (१९०९ चा ३) याखाली किंवा 'प्रांतीय नादारी अधिनियम, १९२०' (१९२० चा ५) याखाली किंवा 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) याच्या कलम ५३० खाली अन्य सर्व ऋणांपूर्वी ज्यांची फेड करावयाची असते त्या ऋणांमध्ये त्यांचा समावेश असल्याचे मानण्यात येईल.

नियोक्त्याने वेतनात घट करावयाची नाही.

१४. कोणताही नियोक्ता, केवळ निधीप्रत कोणतेही अंशदान अथवा या अधिनियमाखाली किंवा योजनेखाली कोणताही खर्चवेच देण्याचे दायित्व त्याच्यावर आहे एवढयाच कारणास्तव प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे ज्याला योजना लागू आहे अशा कोणत्याही खलाशाच्या वेतनात किंवा यानिकगणाशी केलेल्या कराराखाली किंवा नियोक्ता व कर्मचारी या उभय पक्षांमध्ये झालेल्या अन्य कोणत्याही कराराखाली खलाशी ज्याला हक्कदार आहे त्या वार्धक्य पेन्शनाच्या, उपदानाच्या किंवा भविष्य निधीच्या स्वरूपातील लाभांच्या एकूण प्रमाणात घट करणार नाही.

निरीक्षक.

१५. (१) शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या आणि योजनेच्या प्रयोजनार्थ त्याला योग्य वाटतील त्याप्रमाणे मंडळाच्या कर्मचाऱ्यांची निरीक्षक म्हणून नियुक्ती करता येईल आणि त्यांची अधिकारिता निश्चित करता येईल.

(२) पोटकलम (१) खाली नियुक्त केलेला प्रत्येक निरीक्षक, या अधिनियमाच्या किंवा योजनेच्या संबंधात पुरवलेली माहिती यथातथ्य असल्याबाबत चौकशी करण्यासाठी अथवा या अधिनियमाच्या किंवा योजनेच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे अनुपालन केले जात आहे किंवा नाही याची खात्री करून घेण्यासाठी —

(क) योजनेच्या संदर्भात त्याला आवश्यक वाटेल अशी माहिती पुरवण्यास एखाद्या नियोक्त्याला सांगू शकेल ;

(ख) कोणत्याही योग्य वेळी आणि आपणांस योग्य वाटेल असे काही सहाय्य मिळाल्यास त्यानिशी कोणत्याही कार्यालयात प्रवेश करू शकेल किंवा कोणत्याही जहाजावर चढू शकेल, त्याची झडती घेऊ शकेल आणि त्याचा हुकूमतदार म्हणून आढळलेल्या कोणासही, खलाशांचे सेवायोजन किंवा खलाशांना द्यावयाचे वेतन या संबंधातील कोणतेही हिशेब, पुस्तके, नोंदवह्या आणि अन्य दस्तऐवज तपासणीसाठी आपणांपुढे सादर करण्यास सांगू शकेल ;

(ग्) पूर्वोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी संबद्ध असलेल्या कोणत्याही बाबतीत कार्यालयाचा किंवा जहाजाचा हुकूमतदार म्हणून आढळलेला नियोक्ता, त्याचा अभिकर्ता किंवा नोकर किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांची अथवा जो कार्यालयातील किंवा जहाजावरील कर्मचारी असावा किंवा होता असे समजण्यास निरीक्षकाला वाजवी कारण असेल त्याची तपासणी करू शकेल ;

(घ्) निधीच्या संबंधात ठेवलेले कोणतेही पुस्तक, नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज यांच्या नकला काढू शकेल किंवा त्यातील उतारे घेऊ शकेल आणि, जेव्हा या अधिनियमाखालील गुन्हा नियोक्त्याने केला आहे असे समजण्यास त्याला कारण असेल तेव्हा स्वत:ला योग्य वाटेल अशा सहाय्यानिशी, असे पुस्तक, नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज किंवा त्या गुन्ह्याच्या बाबतीत त्याला संबद्ध वाटतील असे त्यातील भाग सक्तीने ताब्यात घेऊ शकेल ;

(ङ्) योजनेद्वारे उपबंधित करण्यात येतील अशा अन्य शक्तींचा वापर करू शकेल.

(३) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याचे उपबंध उक्त संहितेच्या कलम ९८ खाली काढलेल्या वॉरंटाच्या प्राधिकारान्वये घेतलेल्या कोणत्याही झडतीला किंवा अभिग्रहणाला जसे लागू होतात तसे ते पोटकलम (२) खालील कोणत्याही झडतीला किंवा अभिग्रहणाला होईल तेथवर लागू होतील.

(४) प्रत्येक निरीक्षक हा 'भारतीय दंड संहिता, १८६०' (१८६० चा ४५)-कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

१६. (१) जो कोणी, या अधिनियमाखाली किंवा योजनेखाली खुद्द त्याने करावयाचा भरणा टाळण्यासाठी किंवा असा भरणा टाळणे अन्य कोणत्याही व्यक्तीला शक्य व्हावे यासाठी जाणीवपूर्वक कोणतेही खोटे विधान किंवा खोटे अभिवेदन करील किंवा करवील तो, सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल. दंड.

(२) योजनेद्वारा असे उपबंधित करता येईल की, जी व्यक्ती योजनेच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील किंवा त्याचे अनुपालन करण्यात कसूर करील ती, सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(३) जी जी व्यक्ती या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील किंवा त्याचे अनुपालन करण्यामध्ये कसूर करील ती ती व्यक्ती अशा व्यतिक्रमणाबद्दल किंवा अनुपालन न करण्याबद्दल या अधिनियमाद्वारा किंवा त्याखाली इतर अन्य कोणताही दंड उपबंधित केला नसेल तर, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(४) कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली किंवा योजनेखाली शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही गुन्ह्याबाबत, शासनाने याबाबतीत विनिर्दिष्ट केले असेल अशा प्राधिकरणाची पूर्वमंजुरी घेऊन खलाशी भविष्य निधि आयुक्ताने किंवा कलम १५ चे पोटकलम (१) खाली नियुक्त केलेल्या निरीक्षकाने अशा गुन्ह्याला घटकभूत होणाऱ्या तथ्यांबाबत लेखी अहवाल दिल्याशिवाय त्या गुन्ह्याची दखल घेणार नाही.

१७. (१) जर या अधिनियमाखाली किंवा योजनेखाली गुन्हा करणारी व्यक्ती ही कंपनी असेल तर, गुन्हा घडला त्यावेळी कंपनीच्या कामकाज-चालनाचा प्रभार जिच्यावर असेल किंवा त्याबद्दल जी कंपनीला जबाबदार असेल ती प्रत्येक व्यक्ती व तसेच कंपनीही त्या गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा दिली जाण्यास पात्र असेल: कंपन्यांनी केलेले गुन्हे.

परंतु, गुन्हा आपल्या नकळत घडला किंवा असा गुन्हा घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती असे त्या व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या अधिनियमाखाली कोणत्याही शिक्षेला पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखाद्या कंपनीने या अधिनियमाखाली किंवा योजनेखाली गुन्हा केला असेल व कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने गुन्हा करण्यात आला आहे किंवा त्याच्याकडून झालेल्या हलगर्जीपणाशी त्या गुन्ह्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे हे शाबीत करण्यात आले असेल तेव्हा, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हादेखील त्या गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र असेल.

(३) जेव्हा या अधिनियमाखालील किंवा योजनेखालील कोणताही गुन्हा हा, भारतामध्ये नोंदणी न झालेल्या कंपनीने केला असेल आणि अशा कंपनीचा जो अभिकर्ता हा स्वत:देखील कंपनी असेल तो भारतात असल्यास, या कलमाचे उपबंध, गुन्हा जणू काही त्या अभिकर्त्यानेच केलेला असावा त्याप्रमाणे लागू होतील.

**स्पष्टीकरण** :—या कलमाच्या प्रयोजनार्थ—

(क्) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय असा आहे आणि त्यात पेढी व अन्य व्यक्तिसंघ यांचा समावेश आहे; आणि

(ख्) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

नुकसानी वसूल करण्याची शक्ती. १८. जेव्हा कोणताही नियोक्ता निधीप्रत कोणतेही अंशदान करण्यात अथवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाखाली किंवा योजनेखाली द्यावयाचा कोणताही खर्चवेच देण्यात कसूर करील तेव्हा, शासनाला थकबाकीच्या रकमेच्या पंचवीस टक्क्यांहून अधिक नाही एवढ्या मर्यादेपर्यंत त्याला योग्य वाटेल अशी नुकसानी वसूल करता येईल.

खातेबदल. १९. जेव्हा एखादा खलाशी दर्यावर्दी पेशा सोडून देईल आणि त्यावेळी तो पेशा पुन्हा पत्करण्याचा उद्देश न ठेवता, तो ज्या आस्थापनेला 'कर्मचारी भविष्य निधि अधिनियम, १९५२' (१९५२ चा १९) लागू होतो अशा कोणत्याही आस्थापनेत नोकरीला राहील तेव्हा, अशा खलाशाच्या जमाखाती असलेली निधीमधील रक्कम, खलाशाची तशी इच्छा असेल आणि त्या भविष्य निधीच्या संबंधातील नियमांनुसार असा खातेबदल करण्याची परवानगी असेल तर, मंडळ याबाबतीत विनिर्दिष्ट करील तेवढ्या मुदतीत त्या आस्थापनेच्या भविष्य निधीमधील त्याच्या जमाखात्यात बदली केली जाईल.

सूट देण्याची शक्ती. २०. (१) जर मंडळाच्या मते खलाशाला भविष्य निधी किंवा पेन्शन याच्या स्वरूपातील लाभ मिळत असून, असे लाभ हे अलगअलगपणे किंवा संयुक्तपणे, या अधिनियमाखाली तरतूद केलेल्या लाभांपेक्षा एकंदरीत कमी लाभप्रद नसतील तर, मंडळ लेखी आदेशाद्वारे, हा अधिनियम ज्याला लागू होतो त्या कोणत्याही खलाशाला आणि त्याच्या नियोक्त्याला या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधांच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल.

(२) जेव्हा पोटकलम (१) खाली सूट देण्यात आली असेल तेव्हा, नियोक्ता सूट देण्यात आल्यानंतर केव्हाही, अशी सूट दिली गेली त्या वेळी खलाशी ज्यांना हक्कदार होता ते भविष्य निधी, पेन्शन किंवा उपदान या स्वरूपातील लाभ यांच्या एकूण ठरीव प्रमाणात मंडळाच्या परवानगीशिवाय घट करणार नाही.

(३) जर नियोक्ता पोटकलम (२) च्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यास चुकला तर, या कलमाखाली मंजूर झालेली कोणतीही सूट मंडळ लेखी आदेशाद्वारे रद्द करू शकेल:

परंतु, नियोक्त्याला ती सूट रद्द करण्याच्या प्रस्तावाविरुद्ध कारण दाखवण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

सद्भावपूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण. २१. या अधिनियमाखाली किंवा योजनेखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत शासन किंवा मंडळ अथवा मंडळाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी याच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

प्रत्यायोजन. २२. शासन आदेशाद्वारे असे निदेशित करू शकेल की, या अधिनियमाद्वारे किंवा योजनेद्वारे शासनाला कोणतीही शक्ती (कलम ३ खाली योजना तयार करण्याच्या शक्तीहून अन्य) प्रदान केलेली असेल किंवा त्याला कोणतेही कर्तव्य नेमून दिलेले असेल तेव्हा, निदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी काही परिस्थिती असल्यास त्या परिस्थितीमध्ये आणि अशा काही शर्ती असल्यास त्या शर्तींवर, त्याप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात येईल असा अधिकारी किंवा प्राधिकरण यांनीही ती शक्ती वापरावी किंवा ते कर्तव्य पार पाडावे.

(२) मंडळ, योजनेच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी त्याला आवश्यक वाटतील अशी या अधिनियमाखालील त्याची काय शासनाच्या पूर्वमंजुरीने व ते विनिर्दिष्ट करील अशा काही शर्ती आणि मर्यादा असल्यास त्यांच्या अधीनतेने त्याच्या अध्यक्षाकडे किंवा त्याच्या कोणत्याही कर्मचाऱ्याकडे प्रत्यायोजित करू शकेल.

अडचणी दूर करण्याची शक्ती. २३. जर या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवली तर, शासन ती अडचण दूर करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा समयोचित वाटेल त्याप्रमाणे या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल असा आदेश काढू शकेल किंवा निदेश देऊ शकेल आणि असा कोणताही आदेश हा अंतिम असेल.

योजना संसदेच्या सभागृहांपुढे मांडावयाची. २४. या अधिनियमाखाली तयार केलेली कोणतीही योजना, ती तयार करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ते एका सत्राने किंवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवली जाईल आणि ज्या सत्रात ती याप्रमाणे ठेवली गेली ते किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, योजनेच्या कोणत्याही उपबंधात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा योजनेतील एखादा उपबंध करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, योजनेचा तो उपबंध त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या उपबंधाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

# अनुसूची

[कलम ३ (२) पहा.

योजनेमध्ये ज्यांच्यासाठी उपबंध करता येतील अशा बाबी

१ निधीमध्ये कोणत्या खलाशांना सामील व्हावे लागेल.

२. नियोक्त्यांना, तसेच खलाशांना किंवा त्यांच्या वतीने निधीमध्ये किती मुदतीत व कशा रीतीने अंशदान करावे लागेल.

३. निधीचे प्रशासन करण्याचा खर्च भागवण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे नियोक्त्याने द्यावयाच्या रकमा आणि त्या कोणत्या दराने व कशा रीतीने द्यावयाच्या.

४. मंडळाची अन्य कार्ये.

५. मंडळाला साहाय्य करण्यासाठी कोणतीही समिती घटित करणे.

६. मंडळाची प्रादेशिक व अन्य कार्यालये सुरू करणे.

७. हिशेब कशा रीतीने ठेवावे लागतील ते, शासनाने काढलेले निदेश किंवा विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती यांनुसार निधीच्या पैशांच्या गुंतवणुकी, अर्थसंकल्प तयार करणे, लेखापरीक्षा आणि शासनाला अहवाल सादर करणे.

८. ज्या शर्तींवर निधीतून रक्कम काढण्याची परवानगी देता येईल आणि कोणत्याही वजाती किंवा समपहरण करता येईल त्या शर्ती, आणि अशा वजातीची किंवा समपहरणाची कमाल रक्कम.

९. सदस्यांना द्यावयाच्या व्याजाचा दर मंडळाबरोबर शासनाने विचारविनिमय करून निश्चित करणे.

१०. जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा खलाशाने स्वतःची आणि स्वतःच्या कुटुंबाची तपशीलवार माहिती कोणत्या नमुन्यात सादर करावयाची.

११. सदस्याने त्याच्या नावे जमा असलेली रक्कम त्याच्या मृत्यूनंतर जिला मिळावी ती व्यक्ती नामनिर्देशित करणे आणि असे नामनिर्देशन रद्द करणे किंवा त्यात बदल करणे.

१२. खलाशांच्या संबंधात ठेवावयाच्या नोंदवह्या व अभिलेख आणि नियोक्त्याने सादर करावयाची प्रतिवेदने.

१३. या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी आकारावयाची फी.

१४. कलम १६ खाली शिक्षापात्र असतील ती व्यतिक्रमणे व त्या कसुरी.

१५. निरीक्षकाला वापरता येतील अशा आणखी काही शक्ती असल्यास, त्या शक्ती.

१६. कोणत्या शर्तींवर सदस्याला निधीमधून आयुर्विम्याचा हप्ता भरण्यास परवानगी देता येईल.

१७. योजनेमध्ये ज्याबाबत उपबंध करावयाचा असतो अशी अथवा योजना कार्यान्वित करण्याच्या प्रयोजनार्थ जी आवश्यक किंवा योग्य असेल अशी अन्य कोणतीही बाब.

## THE SEAMEN'S PROVIDENT FUND ACT, 1966

## खलाशी भविष्य निधि अधिनियम, १९६६

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| charges | खर्चवेच | [S. 10] |
| continuous discharge certificate | सलग विमुक्ति-प्रमाणपत्र | [S. 2(c)] |
| contribution | अंशदान | [S. 2(d)] |
| crew | यानिकगण | [S. 2 (a)] |
| deck barber | जहाजी नापित | [S. 2(l)] |
| employed or engaged | नोकरीला किंवा कामाला ठेवलेली | [S. 2(l)] |
| master | नौकाधिपति | [S. 2(h)] |
| Merchant Shipping Act | व्यापारी नौवहन अधिनियम | [S. 2(j)] |
| pilot | बंदरवाटाडचा | [S. 2(l)] |
| purser | पोतनीस | [S. 2(l)] |
| radio officer | रेडिओ अधिकारी | [S. 2(l)] |
| scheme | योजना | [S. 2(k)] |
| seafaring profession | दर्यावर्दी पेशा | [S. 19] |
| seaman | खलाशी | [S. 2(l)] |
| transfer of account | खातेबदल | [S. 19-m.n.] |
| wages | वेतन | [S. 2(n)] |

## खलाशी भविष्य निधि अधिनियम, १९६६

## THE SEAMEN'S PROVIDENT FUND ACT, 1966

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अंशदान | contribution | [S. 2(d)] |
| खर्चवेच | charges | [S. 10] |
| खलाशी | seaman | [S. 2(l)] |
| खातेबदल | transfer of account | [S 19-m.n.] |
| जहाजी नापित | deck barber | [S. 2(l)] |
| दर्यावर्दी पेशा | seafaring profession | [S. 19] |
| नोकरीला किंवा कामाला ठेवलेली | employed or engaged | [S. 2(l)] |
| नौकाधिपति | master | [S. 2(h)] |
| पोतनीस | purser | [S. 2(l)] |
| बंदरवाटाडचा | pilot | [S. 2 (l)] |
| यानिकगण | crew | [S. 2(a)] |
| योजना | scheme | [S. 2(k)] |
| रेडिओ अधिकारी | radio officer | [S. 2 (l)] |
| वेतन | wages | [S. 2(n)] |
| व्यापारी नौवहन अधिनियम | Merchant Shipping Act | [S. 2(j)] |
| सलग विमुक्ति-प्रमाणपत्र | continuous discharge certificate | [S. 2(c)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई